## निशाणी क्र. ०५ वरील आदेश.

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जाचा निकाल लागे पर्यंत गैरअर्जदारांकडुन त्यांना अंतरीम पोटगीसाठी एकत्रीतपणे २०,०००/– आणि घरभाडया करीता ५,०००/– रुपये मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जदारांचे थोडक्यात कथन –** अर्जदार क्र.१ चा गैरअर्जदार क्र.१ पती असून अर्जदार क्र.२ व ३ ही त्यांची अपत्ये आहेत. लग्नानंतर एक महिन्याने गैरअर्जदार क्र.१ कामाच्या ठिकाणी मुंबईला घेऊन गेला असता, गैरअर्जदार क्र.२ जबरदस्तीने अर्जदार क्र.१ ला घालून पाडून बोलून, अपमानित करुन दुस–याच्या शेतात कामाला पाठवून शारिरीक व मानसिक त्रास देऊ लागली होती. सदर बाब अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदार क्र.१ ला सांगून त्याच्या सोबत मुंबईला राहण्यास गेल्यावर तिला प्रथमतः गैरअर्जदार क्र.१ ला दारुचे व्यसन असल्याचे समजले होते. मुंबईमध्ये एकत्र राहत असताना अर्जदार क्र.१ कामावर जात नसल्याच्या कारणावरुन गैरअर्जदार क्र.१ तिला दारुच्या नशेत सतत मारहाण करत होता. गैरअर्जदार क्र.१ च्या त्रासामुळे अर्जदार क्र.१ ने जवळील कापड दुकानात काम करण्यास सुरुवात केली होती. अर्जदार क्र.१ ला कामामुळे रात्री घरी येण्यास उशिर होत असल्यामुळे गैरअर्जदार क्र.१ तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करत होता. अर्जदार क्र.१ ने चांगल्या संसाराच्या उद्देशाने गैरअर्जदार क्र.१ चा संपुर्ण त्रास सहन करुन देखील त्याच्या स्वभावात कोणताही बदल झाला नाही. त्याने अर्जदार क्र.१ च्या दोन्ही मुलींच्या जन्मापुर्वी अथवा त्यांच्या प्रसूतीमध्ये कोणतेही सहकार्य अथवा मदत केलेली नाही. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ने दोन्ही मुलींना जन्म दिल्यामुळे गैरअर्जदारांनी नाराजीने वारंवार मानसिक त्रास दिलेला आहे. अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदारांकडे तिला त्रास न देता नांदवून घेण्याची विनंती केली असता, मुली झाल्याच्या कारणावरुन त्यांनी तिला नांदवण्यास नकार देऊन घटस्फोटाची मागणी करुन सोबत राहायचे असल्यास दोन लाख रुपये आणण्यास सांगून त्याच्या पुर्ततेसाठी तिला दि.१५.०१.२०२३ रोजी घराबाहेर हकलून दिलेले आहे. तेव्हापासून अर्जदार क्र.१ मुलींसह आई–वडिलांच्या घरी राहत असून गैरअर्जदारांना त्यांच्या दैनंदिन गरजांची आणि उदरनिर्वाहाची कोणतीही चौकशी अथवा तरतूद

केलेली नाही. अर्जदार क्र.१ ला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून स्वतःसह मुलींचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार क्र.१ हा सेंट्रींग कॉन्ट्रॅक्टर असून त्याला सदर व्यवसायातून दरमहा ७० ते ८०,०००/- रुपये आणि मेंढोली येथील दोन एकर शेतीपासून प्रतिवर्ष दोन लाखांचे उत्पन्न मिळते. सबब, अर्जदारांनी त्यांच्या व्यतिरिक्त गैरअर्जदार क्र.१ वरती इतर कोणाचीही जबाबदारी नसल्यामुळे मुख्य अर्जाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत त्यांची अंतरिम पोटगी व घरभाडे देण्याबाबतची मागणी मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. **गैरअर्जदारांचे थोडक्यात कथन–** गैरअर्जदारांनी नि.क्र. ९ प्रमाणे लेखी म्हणणे दाखल करुन अर्जदारां सोबतचे नातेसंबंध स्विकारुन त्यांनी केलेले सर्व आरोप नाकारले आहेत. त्यांच्या कथनाप्रमाणे लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही त्यांच्या सोबत दोन ते तीन वर्षे चांगली नांदल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ कडे मुंबई वरुन आल्यावर त्याच्या सोबत मुंबईला जाण्याची मागणी करुन मुंबईला नेले नाही तर नांदणार नाही अशी धमकी देत होती. सबब, गैरअर्जदार क्र.१ ने तिला मुंबईला नेल्यानंतर तिच्यावरती कधीही शारिरीक व मानसिक हिंसाचार केलेला नसून वेळोवेळी आवश्यक असणा–या सर्व गरजांची पुर्तता करुन दिली आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ने मुलींना जन्म दिल्यामुळे कधीही तिला त्रास देऊन बळजबरीने कामासाठी पाठविलेले नसून घटस्फोटाची अथवा पैशांची मागणी केलेली नाही. गैरअर्जदार क्र.१ मुंबईतील नोकरी सोडून गावी शेती करत असल्यामुळे अर्जदार क्र.१ किरकोळ कारणावरुन गैरअर्जदारांशी भांडणे करुन त्याला जिवे मारण्याची तसेच घरातील सर्व व्यवहार माझ्याकडे पाहिजे अशी मागणी करुन त्रास देत होती. अर्जदार क्र.१ दि.१५.०१.२०२३ रोजी मुलींसह स्वतः कमावलेले काजू कारखान्यातील पैसे आणि स्त्रीधन घेऊन माहेरी निघून गेलेली आहे. गैरअर्जदारांनी मध्यस्थां मार्फत प्रयत्न करुन देखील अर्जदार क्र.१ ने नांदावयास येण्यास नकार दिलेला आहे. अर्जदारांच्या कथना प्रमाणे गैरअर्जदार क्र.१ ला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार क्र.१ शेतीतून मिळणा–या तुटपुंज्या उत्पन्नातून त्याच्या परिवाराचा खर्च भागवत असल्यामुळे तो अर्जदारांना आर्थिक मदत पुरवू शकत नाही. अर्जदार क्र.१ ने जाणीवपूर्वक गैरअर्जदारांचा त्याग केलेला आहे. सबब, त्यांना पोटगी अथवा घरभाडयाची आवश्यकता नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. **विचाराधीन मुद्दे –** अर्ज व लेखी म्हणण्याचे तसेच अर्जदारांच्या वकिलांच्या तोंडी व गैरअर्जदारांच्या वकिलांच्या नि. क्र.१३ वरील लेखी युक्तीवादाचे आणि त्यांनी दाखल केलेल्या

मालमत्ता व उत्तरदायित्वाच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता माझ्या विचारार्थ खालील मुद्दे निघतात. मी त्यांचे निष्कर्ष कारणांसह खालील प्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्र. | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ने प्रथमदर्शनी तिच्यावरती कौटुंबिक हिंसाचार झाल्याची बाब सिद्ध केली आहेत काय ? | . . **होय.** |
| २. | अर्जदार हे निवास भाडे आणि अंतरीम पोटगीचा आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | . .**अंशतः होय.** |
| ३. | अंतिम आदेश काय ? | . . **अंतिम आदेशा प्रमाणे.** |

## कारणेमिमांसा

५. **मुद्दा क्र.१ व २ साठी –** मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी संबंधीत असल्याने ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले आहेत. अर्जदाराच्या आणि गैरअर्जदारांच्या वकीलांच्या युक्तीवादाचे अवलोकन करता कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या कलम ३ मध्ये घरगुती हिंसाचाराची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये शारिरिक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक छळ इत्यादी बाबींचा समावेश होतो.

६. अर्जदाराच्या वकीलांनी गैरअर्जदारांनी त्यांच्या बेकायदेशीर मागण्यांसाठी अर्जदारावरती केलेल्या हिंसाचाराच्या कथनांची पुनरावृत्ती केली आहे. त्यांनी अर्जदार हे वेगळे राहत असल्यापासून गैरअर्जदार क्र. १ ने त्यांच्या दैनंदिन गरजांची पुर्तता केलेली नसल्याचे सांगून अर्ज निकाली लागेपर्यंत अंतरिम पोटगी व घरभाडे देण्याची विनंती केली आहे. याउलट, गैरअर्जदारांच्या वकिलांनी अर्जदार क्र.१ ने तिच्या गैरवाजवी मागण्यांच्या पुर्ततेसाठी गैरअर्जदार क्र.१ चा स्वतःहून त्याग केलेला असून तिच्यावरती कोणताही कौटुंबिक हिंसाचार झालेला नसल्याचे सांगितले आहे.

७. अर्ज व त्यास दाखल केलेल्या लेखी म्हणण्याचे अवलोकन केले असता सद्या अर्जदार व गैरअर्जदार मधील नाते संबंध अस्तीत्वात असुन अर्जदार हे वेगळे राहत असल्याचे दिसुन येत आहे. अर्जदार क्र.१ ने तीच्यावरती गैरअर्जदार क्र.१ ने केलेल्या शारिरीक व मानसिक हिंसाचाराचे स्पष्टपणे कथन केले आहे. तीने गैरअर्जदार क्र.१ ने तीच्यावरती केलेल्या कौटुंबिक

छळामुळे ती त्याच्यापासुन वेगळी राहत असल्याचे सांगितले आहे. तीने गैरअर्जदार क्र.१ ने तिला दारुच्या नशेत तिच्या चारित्र्यावरती संशय घेऊन मारहाण केल्याचे स्पष्ट आरोप केले आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या लेखी कथनातून अर्जदार क्र.१ ने स्वतःहुन त्यांचा त्याग केल्याचा बचाव घेतला आहे, परंतु त्याबाबतचा कोणताही प्रथमदर्शी पुरावा दिलेला नाही. तसेच अर्जदार वेगळी राहत असल्यापासुन तिला गैरअर्जदार क्र. १ ने कशाप्रकारे आर्थीक मदत केली याचे देखील कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे वरील सर्व बाबी या महिलांच्या शारिरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक हिंसाचार या व्याख्येमध्ये मोडत असल्याने गैरअर्जदार ने अर्जदाराचा घरगुती हिंसाचार केला आहे ही बाब प्रथमदर्शनी सिद्ध होते. तसेच या ठिकाणी गैरअर्जदारांनी लेखी म्हणणे दाखल करण्यासाठी तसेच सदर अर्जावरती युक्तिवाद करण्यासाठी वेगवेगळया कारणांनी घेतलेल्या मुदतीचा देखील विचार करणे गरजेचे आहे.

८. अर्जदाराने गैरअर्जदार च्या विरोधात स्पष्टपणे आरोप केलेले आहेत. उभय पक्षकारांमधील लग्न संबंध अस्तीत्वात असुन अर्जदार व गैरअर्जदारांनी केलेले आरोप व प्रत्यारोप हे संपुर्णपणे पुराव्याचा भाग असुन ते गुणदोषांवर सिद्ध झाल्यानंतर विचारात घेतले जातील. गैरअर्जदार क्र. १ ने केवळ अर्जदाराने त्याचा स्वतःहुन त्याग केल्याचा बचाव घेतला आहे. सबब मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या ***नकुल वि. पदमीणी, २०१६ एस.सी.सी. ऑन लाईन बॉम्बे, १०६२४*** मधील न्यायतत्वाप्रमाणे अर्जदाराने स्वतःहुन त्याग केलेला असल्यामुळे पोटगी मिळण्यास पात्र नसल्याचा बचाव अंतरिम पोटगीच्या बाबत विचारात घेता येवु शकत नसल्याचा निष्कर्शावरुन अंतरीम स्थितीमध्ये असे दिसुन येते की, अर्जदार हे गैरअर्जदार क्र. १ पासुन वेगळे राहत असुन त्यांच्या मुलभुत गरजांबाबत गैरअर्जदार क्र. १ ने कोणतीही तरतुद केलेली नसून तो त्याच्यावरील कायदेशीर व नैतिक जबाबदारीमधुन पळ काढु शकत नाही. सबब, त्याने अर्जदारांना आर्थिक मदत पुरविणे क्रमप्राप्त आहे.

९. अर्जदारांच्या कथना प्रमाणे गैरअर्जदार क्र. १ ला सेट्रींग कॉन्ट्रॅक्टच्या व्यवसायापासून दरमहा ७० ते ८०,०००/– रुपये आणि शेतीपासून प्रतिवर्ष दोन लाखांचे उत्पन्न मिळत आहे. अर्जदार क्र.१ ने तिच्या मालकी व दायित्वाच्या शपथपत्राद्वारे तिची आर्थिक परिस्थिती पटलावरती आणली आहे. अर्जदार क्र.१ वरील इतर अर्जदारांची जबाबदारी विचारात घेता, तिला नोकरी अथवा इतर कोणताही व्यवसाय करणे शक्य नाही. गैरअर्जदार क्र.१ ने त्याच्या

मालमत्ता व उत्तरदायित्वाच्या शपथपत्रातून त्याच्या उत्पन्नाचा पुर्ण तपशील दिलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ हा शारिरीकदृष्टया सक्षम असून शेती व्यवसाय करतो. यावरुन त्याला निश्चितच चांगले उत्पन्न मिळत असल्याचा निष्कर्ष काढता येऊ शकतो.

**१०.** त्यामुळे जरी गैरअर्जदार क्र.१ च्या व्यवसाया बाबतचा अर्जदारांनी प्रथमदर्शी पुरावा दिलेला नसला तरी गैरअर्जदार क्र. १ ने मान्य केलेल्या शेती व्यवसायाचा आणि त्याच्या शारिरीक क्षमतेचा विचार करता, निश्चितच तो दरमहा १२ ते १५,०००/- रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवू शकतो. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ला काजू कारखान्यातील मजूरी पासून उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्याबाबतचा कोणताही प्रथमदर्शी पुरावा दिलेला नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ चे वय आणि तिच्यावरील दोन अज्ञान मुलींच्या जबाबदारीचा विचार करता, तिला एकत्रीतपणे दरमहा ५,०००/- रुपयांची आवश्यकता असून गैरअर्जदार क्र.१ हा सदर रक्कम देण्यास सक्षम आहे.

**११.** अर्जदारांनी सध्या ते भाडयाने राहत असल्याबाबतचा किंवा सध्या राहत असलेले ठिकाण अपायकारक असल्याचा कोणताही पुरावा दिलेला नसल्यामुळे त्यांची सदर मागणी सद्यस्थीतीत मान्य करता येवु शकत नाही. त्यामुळे अर्जाचा अंतिम निकाल लागण्यासाठी लागणा-या वेळेचा, एकंदरीत जीवनावश्यक वस्तुंच्या वाढलेल्या किंमतीचा, शिक्षणाचा व वैद्यकीय उपचारांचा आणि त्यांच्या वयाचा विचार करता आजपर्यंत कोणतीही रक्कम दिलेली नसल्यामुळे अर्जदारांना दरमहा एकत्रीतपणे ५,०००/- रुपये अर्ज दाखल तारखेपासुन अर्जाचा निकाल लागे पर्यंत अंतरीम पोटगी म्हणुन देणे न्यायाचे ठरेल. सबब, मी वरील विवेचना वरुन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होय आणि मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष आर्थिक मदतीसाठी अंशतः होकारार्थी असा नोंदवुन मुद्दा क्र.३ साठी खालील आदेश पारित करीत आहे,

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ ने अर्ज दाखल तारखे पासुन अर्जदारांना मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत एकत्रीतपणे दरमहा ५,०००/- ( पाच हजार रुपये ) रुपये अंतरीम आर्थिक मदत म्हणुन द्यावी.

३. गैरअर्जदार क्र. १ ने सदरची रक्कम दर महिन्याच्या १० तारखेपुर्वी अर्जदार क्र.१ च्या बँक

खात्यात ऑनलाईन किंवा प्रचलित माध्यमाने अथवा रोखीने जमा करावी.

**४.** गैरअर्जदार क्र. १ ने आर्थीक मदतीची अर्ज दाखल तारखेपासुन आदेश तारखेपर्यंतची देय असलेली संपुर्ण रक्कम २ महिन्यांच्या कालावधीमध्ये नियमित आर्थीक मदतीच्या रक्कमेसह अर्जदाराच्या बँक खात्यात अथवा रोखीने अथवा प्रचलित माध्यमाने जमा करावी.

**५.** अर्जदाराने संयुक्तीक कारणाशिवाय पुरावा देण्यास अथवा प्रकरण चालविण्यास जाणीव पुर्वक विलंब केल्यास मंजुर करण्यात आलेली आर्थीक मदतीची रक्कम विलंबाच्या कालावधीसाठी रदद करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**६.** उभय पक्षकारांनी प्रकरणास प्राधान्य देवुन लवकरात लवकर निकाली काढावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

दिनांक :– २४.०१.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

ठिकाण :– आजरा. आजरा.